**सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – शंकर विष्णु नाबदे,

वय – ३९ वर्षे, व्यवसाय–कुरीअर वाटप,

राहणार – नेवासा खुर्द, ता. नेवासा, जि. अहमदनगर.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.पी. औताडे यांचे मार्फत सुरुः–**

१. दिनांक ०५/०८/२०२२ रोजी पोलिसांनी मला कोठेही बोलवले नव्हते. माझ्यासमक्ष पोलिसांनी काहीही जप्त केले नव्हते. मी जप्ती पंचनाम्यावर सही केली होती, परंतु त्यातील मजकुर वाचून पाहिला नव्हता. आता मला जप्ती पंचनामा दाखवण्यात आला त्यावर अनुक्रमांक १ ला माझी सही आहे, त्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. सहीस **निशाणी ९** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली**.

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५/०८/२०२२ रोजी मला पोलिसांनी नेवासा पोलिस स्टेशनला जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी आरोपी पोलिस स्टेशनला हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी पोलिसांनी माझ्यासमक्ष अडीच फुट लांबीची पाते असलेली तलवार जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती पंचनामा पोलिसांनी माझेसमक्ष तयार केला, तो मला वाचून दाखवला व मी त्यावर वाचून सही केली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी

हा माझ्या गावातील रहिवाशी आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या गावातील रहिवाशी असल्याने आरोपीला वाचवण्यासाठी आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे ॲड. जे.बी. इनामदार यांनी नाकारला.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

सही/-
(**श्रीमती.ए.एन.सरक**)
दिनांक-११/०७/२०२४. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), नेवासा